**<u>निशाण क्रमांक ०४ खालील आदेश</u>.**

अर्जदार यांनी सदरचा अर्ज सामनेवाला यांच्या विरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे व मुळ अर्जातील कथने सदर अर्जाचे कामी वाचणेस विनंती केली आहे.

०२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह दिनांक २८.०४.२०१९ रोजी झाला असुन अर्जदार क्र.१ च्या वडीलांनी लग्नात तीन लाख रुपये हुंडा दिला. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र.१ कडे नांदण्यासाठी गेली असता सामनेवाला क्र.३ व ४ ह्या अर्जदार क्र.१ हिला त्रास देत होत्या व सामनेवाला क्र.१ ला लावुन देत असत व म्हणत होत्या की, *तुझ्या बायकोने माहेरुन रक्कम रु.५,००,०००/–आणावे.* त्यानंतर सामनेवाला क्र.१ कडुन अर्जदार क्र.१ हिला एक मुलगी प्रांजली झाली. दिनांक २५.१२.२०२१ रोजी सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ ला घरामध्ये कोंडुन ठेवले व बेदम मारहाण केली. तसेच सामनेवाला क्र.३ हिने सामनेवाला क्र.१ ला चाकु आणुन दिला व म्हणत होती हिचा खुन कर. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ ला व तिच्या मुलीला घराबाहेर काढुन दिले.

०३. पुढे तिने असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ हिने सामेनवालाविरुध्द रिपोर्ट दिल्यावरुन प्रकरण महिला तकार निवारण कक्ष येथे सुरु होते. सामनेवाला क्र.१ हा पोलीस खात्यात असल्याने त्याने सर्व बाजुने अर्जदार क्र.१ वर दबाव आणुन अर्जदार क्र.१ हिस महिला तक्रार कक्षातुन प्रकरण वापस घेण्यास भाग पाडले. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिला *''तु कोणत्या पोलीस स्टेशनमध्ये जायचे तेथे जा, सगळे पोलीस माझेच आहेत, माझे काही वाकडे होवु शकत नाही''*. तसेच सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ च्या वडीलांना सुध्दा तुमची मुलगी नांदवण्याबाबत विषय काढला तर पाय तोडुन टाकीन अशी धमकी दिली. तसेच सामनेवाल्यांनी अर्जदार क्र.१ हिच्या अंगावरील सर्व दागीने काढुन घेतले व तिला बेदम मारहाण केली. तसेच तु मुकाट्याने फारकती दे नाही तर सामनेवाला क्र.१ हा

पोलीस खात्यात असल्याचा गैरफायदा घेवुन तुझे माहेरच्या लोकांवर खोट्या केसेस करुन त्यांना जेलमध्ये पाठवु असे म्हणत होते. अर्जदार क्र.१ च्या माहेरच्या लोकांनी सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ हिला नांदवावे म्हणुन प्रयत्न केले. परंतु सामनेवाला क्र.१ हा ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याचे त्यांनी कथन केले. दिनांक २७.१२.२०२१ रोजी पासुन अर्जदार क्र.१ व २ ह्या माहेरी राहत असुन सामनेवाला क्र.१ ने त्यांची कोणत्याही प्रकारची व्यवस्था केली नाही. सामनेवाला क्र.१ हे सधन व श्रीमंत असुन तो पोलीस खात्यामध्ये नोकरीवर असुन त्याला दरमहा रक्कम रु.८०,०००/–पगार मिळतो. तसेच सामनेवाला क्र.१ यांच्याकडे रक्कम रु. ५०,००,०००/– दोन प्लॉट घेतलेले आहे.

०४. अर्जदार हिला स्वतःच्या उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे तिला व तिच्या मुलीच्या उदरनिर्वाहासाठी, एकुण रक्कम रु.४०,०००/– अंतरिम पोटगी मिळणेबाबत विनंती केली आहे. तसेच मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार करु नये अशी मागणी केली आहे.

०५. सामनेवाला यांनी अर्जदार यांच्या सदर अर्जास निशाणी १४ वर म्हणणे सादर करुन अर्जदार यांची सर्व कथने स्पष्टपणे नाकारली आहेत व अर्जदार यांचा अर्ज चुकीचा व लबाडीचा असल्याचे कथन केले आहे. तसेच सामनेवाला यांनी नातेसंबंधाबाबत वाद नसल्याचे कथन केलेले आहे. याउलट, सामनेवाला क्र.१ यांचा विवाह अर्जदार क्र.१ हिच्यासोबत त्याच्या स्वतः च्या खर्चाने झाल्याचे, अर्जदार क्र.१ ही सामेनवाला क्र.१ याला तिचे लग्न तिच्या वडीलांनी तिच्या इच्छेविरुध्द सामनेवाला क्र.१ सोबत जबरदस्ती लावुन दिल्याचे सांगत असल्याचे, तिला तिच्या आत्याच्या मुलासोबत लग्न करावयाचे असल्याचे, अर्जदार ही सामनेवाला क्र.१ व त्याच्या म्हाता–या आईसोबत विनाकारण भांडण करुन माहेरी निघुन येत असल्याचे, ती त्यांना सतत आत्महत्या करण्याच्या धमक्या देत असल्याचे तसेच तिने दिनांक ०८.१०.२०१९ रोजी सुसाईड नोट लिहुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे, तसेच ती सामनेवाला यांना तिला मुलबाळ होऊ द्यायचे नाही व तीने गर्भपात करण्याचा प्रयत्न केल्याचे, ती सामनेवाला क्र.१ याला नेहमी वेगळे राहण्याचा तगादा लावत असल्याचे, अर्जदार क्र. १ हिचे आई–वडील देखील सामनेवाला क्र.१ यांना तुम्ही वेगळे राहाल तरच आमची मुलगी तुमच्यासोबत नांदेल अन्यथा फारकती द्या तसेच तिच्या जिवाचे काही बरेवाईट झाले तर त्याला तुम्ही जबाबदार राहाल अशा धमक्या देत असल्याचे, अर्जदार क्र.१ ही तिच्या आई–

वडीलांची अतीशय लाडकी असल्याने ती सामनेवाला क्र. १ सोबत संसार करीत नसल्याचे, अर्जदार क्र.१ हिने दिनांक १३.११. २०२३ रोजी खोटी व बनावटी घटना तयार करुन सदर प्रकरणाला कोणतेही कारण घडलेले नसतांना अर्जामध्ये खोटे कथन केलेले असल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची सामनेवाला यांनी विनंती केली आहे.

०६. प्रकरणामधील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०७. अर्जदार यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता सकृतदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह झाल्याचे तसेच सदर विवाहसंबंधातुन अर्जदार क्र.२ हिचा जन्म झाल्याची बाब मान्य केलेली आहे. प्रथमदर्शनी अर्जदार व सामनेवाला यांनी एकमेकांविरुध्द कथने व प्रतिकथने केल्याचे दिसते. अर्जदाराच्या कथनानुसार सामनेवाला यांनी तिचा छळ व पैशांची मागणी केल्याने ती नाईलाजास्तव माहेरी राहत असल्याचे कथन केले आहे. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिच्या ईच्छेविरुध्द लग्न झाले असल्यामुळे व संयुक्त कारण नसतांना खोट्या व बनावट मजकुराचा अर्ज केला असल्याचे प्रतिकथन केलेले आहे. सदर कथने व प्रतिकथने या संदर्भात अर्जाच्या मुळ चौकशीच्यावेळी व पुराव्याच्यावेळी उहापोह करणे न्यायोचित ठरेल. सकृतदर्शनी, अर्जदार हिने केलेल्या कथनांचा विचार केला असता सदर कथने ही आर्थीक, शारिरिक व मानसिक हिंसाचार या व्याख्येत मोडतात. तसेच अर्जदार माहेरी राहत असल्याची बाब ही देखील सामनेवाला यांनी मान्य केलेली आहे. फक्त अर्जदार हिच्या कथनानुसार ती सामनेवाला क्र.१ च्या छळास कंटाळुन माहेरी राहत आहे. तर सामनेवालांच्या प्रतिकथनानुसार अर्जदार ही कोणतेही संयुक्त कारण नसतांना माहेरी राहत आहे. तसेच सकृतदर्शनी सामनेवाला यांनी अर्जातील कथने अमान्य केली असली तरी, सदरची बाब ही दोन्ही बाजूचा पुरावा ऐकल्यानंतर स्पष्ट होईल. सर्वसाधारपणे कोणतेही विवाहीत अपत्य असलेली स्त्री ही विनाकारण तिचे संसाराचा त्याग करीत नाही व माहेरी राहत नाही. जरी, सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदार यांच्या सर्व कथनांचा इन्कार केला असला तरी, पत्नीचा सांभाळ करणे हे देखील पतीचे नैतीक व कायदेशीर कर्तव्य आहे. मात्र सामनेवाला यांनी या सर्व कर्तव्यांकडे दुर्लक्ष केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते व अर्जदार यांची पालनपोषणाची सोय केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे सकृतदर्शनी सामनेवाला हा अर्जदार क्र.१ व २ यांना अंतरीम पोटगी देण्यास बांधील राहतो. अर्जदार हिने तिच्या अर्जात

सामनेवाला क्र.१ हा पोलीस खात्यात असल्याचे व त्याला दरमहा रक्कम रु.८०,०००/- उत्पन्न मिळते तसेच त्याच्याकडे रक्कम रु.५०,००,०००/- दोन प्लॉट असल्याचे कथन केलेले आहे. तसेच सामनेवाला क्र.१ हा पोलीस खात्यात नोकरीला असल्याची बाब त्याला मान्य असल्याचे त्याने कथन केलेले आहे व त्याने त्याच्या उत्पन्न व दावित्वाचे प्रतिज्ञापत्रात मासीक उत्पन्न रक्कम रु.४८,०००/- दाखविले आहे.

०८. त्यामुळे, सकृतदर्शनी उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, नैसर्गिक न्यायतत्वानुसार, एकंदर जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती, उभयपक्षकारांचे राहणीमान, सध्याची महागाई, अर्जदार करीत असलेली नोकरी या सर्व बाबी विचारात घेता सामनेवाला क्र.१ ने अर्जदार हिस रक्कम रुपये १०,०००/- (दहा हजार रुपये फक्त) प्रमाणे अंतरिम पोटगी आदेशीत करणे न्यायीक ठरेल. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>.**

१. अर्ज निशाणी ०४, अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ यांनी निशाण ०४ वरील अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार हिस रक्कम रुपये १०,०००/- **(दहा हजार रुपये फक्त)** इतकी रक्कम अंतरीम पोटगी म्हणून द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत संरक्षण अधिकारी, मालेगांव यांना पाठविण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by AMIT SUNIL KOSHTI
Date: 2025.04.16 15:11:41 +0530

स्थळ – मालेगांव.
दिनांक. ०२.०४.२०२५.

( **अ. सु. कोष्टी** )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मालेगांव.

**CERTIFICATE**

**I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.**

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Shri. C. R. Lande (Grade III ) |
| Name of Court | C.J.J.D. & J.M.F.C., Malegaon, Distt. Washim. |
| Date of Dictation | 02/04/2025 |
| Judgment/Order signed by the PO on | 02/04/2025 |
| Judgment /Order uploaded on | 17/04/2025 |